Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-6 | June - 2025

Original Article

# चीनचा भारत शेजारी राज्यावर वाढता प्रभाव व भारत-चीन विवाद

**आशिष बबनराव पेठे[1], प्रा.डॉ.विभा प्र. देशपांडे[2]**
[1]संशोधक विद्यार्थी, कला व विज्ञान महाविद्यालय, कु-हा, विभाग प्रमुख
[2]मार्गदर्शक,राज्यशास्त्र, कला व विज्ञान महाविद्यालय, कु-हा
**Email-** ashishpethe12@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170614
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 6|
Pp. 70-72
June 2025
**Submitted:** 03. May. 2025
**Revised:** 21 May. 2025
**Accepted:** 06 June. 2025
**Published:** 31 June. 2025

***सारांश :-***

*भारत-चीन आशिया खंडातील महत्वपूर्ण देश आहे, दोन्ही देश आपले वर्चस्व आशिया खंडावर व पर्यायाने संपूर्ण जगात निर्माण व्हावे यासाठी प्रयत्नशील असतात. भारत व चीन या दोन्ही देशामध्ये सीमावाद दिसून येतो. याचा परिणाम 1962 च्या युध्दात झालेला दिसतो, परिणामी भारत व चीन हे दोन्ही देश एकमेकांना घेरण्याचा प्रयत्न करतात, व त्याप्रमाणे रणनिती आखतात. आज चीन भारताच्या शेजारी राष्ट्रावर प्रभाव वाढवून आपले वर्चस्व निर्माण करु पाहतो. भारताच्या दृष्टीने हे घातक असून भारताने याकडे आपले लक्ष केन्द्रीत करुन पाकिस्तान, नेपाळ, श्रीलंका, बांग्लादेश यांच्यात चांगले संबंध प्रस्थापित करुन चीनचा या देशांवर वाढता प्रभाव कमी करणे आवश्यक आहे.*

***मुळ शब्द :-*** *विवाद, सीमा, वर्चस्व, करार, सीमावाद, प्रभाव, शेजारी*

## प्रस्तावना :-

भारत हा आशिया खंडातील एक प्रमुख देश असून भारताप्रमाणे चीन सुध्दा आशिया खंडातील एक महत्वपूर्ण देश आहे. या दोन्ही देशाचा आशिया खंडावर प्रभाव दिसून येतो. दोन्ही देश आशिया खंडात आपला प्रभाव असावा यासाठी प्रयत्नशील असतात, दोन्ही देशामध्ये काही बाबतीत साम्य आढळते तर काही बाबतीत विषयमता दिसून येते. 1947 मध्ये भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले व चीन मध्ये 1949 मध्ये साम्यवादी क्रांती झाली. भारताने सत्याग्रह व अहिंसा या महात्मा गांधी तत्वांचा आधार घेत ब्रिटीश विरोधात आपले आंदोलन शांततेच्या व अहिंसेच्या मार्गाने केले तर चीन मध्ये माओ च्या नैतृत्वात साम्यवादी क्रांती घडून आली. माओ च्या मते "सत्ता ही बंदूकीच्या नळीतूनच प्राप्त होते" म्हणजेच चीनची क्रांती हिंसा या तत्वावर आधारीत होती. अशा प्रकारे आशिया खंडामध्ये या दोन सत्ताचा उदय जगाच्या पटलावर झाला. सुरुवातीला भारत व चीन या दोन्ही देशासमोर अनेक समस्या होत्या, यात बेरोजगारी, गरीब, भूकमरी वाढती लोकसंख्या, औद्योगीकरण, मागास अर्थव्यवस्था म्हणून या दोन्ही देशांनी आपले लक्ष आपली अंतर्गत समस्या दुरुस्त करण्यास भर दयावे अशी भारताची इच्छा होती. या दृष्टीने प्रयत्नही करण्यात आले. भारताचे पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी चीन सोबत सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्यास सुरुवात केली, व आंतरराष्ट्रीय पातळीवर चीनला सार्वभौम राज्य म्हणून 1 एप्रिल 1950 मध्ये मान्यता देऊन चीन सोबत राजकीय संबंधाची सुरुवात केली. चीनला मान्यता देणारा गैर साम्यवादी भारत हा प्रथम देश होता. चीन सोबत अधिक संबंध सुदृढ व्हावे म्हणून पंडीत नेहरु यांना पंचशील करार केला.

28 एप्रिल 1954 मध्ये भारत व चीन यांच्यात पंचशील करार करण्यात आला. या करारात पाच तत्वे होती जी भारत व चीन यांच्यात मैत्रीपूर्ण संबंध अधिक मजबूत करण्यात महत्वपूर्ण होती. सुरुवातीच्या काळात भारत व चीन यांचे संबंध चांगले दिसून येतात, यामागचे कारण आपण असे सांगू शकतो की, पाकिस्तान भारत यांच्या मध्ये होत असलेल्या तणावामध्ये अमेरिका नेहमी पाकिस्तानची बाजू घ्यायचा, म्हणून भारताने चीन सोबत आपले संबंध व्यवस्थित ठेवण्यास प्राधान्य दिले, म्हणूनच चीन जेव्हा तिबेट मध्ये घूसखोरी करीत होता तेव्हा भारत शांत होता, पण जेव्हा 1959 मध्ये दलाई लामा यांना भारताने शरण

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
OPEN ACCESS

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*आशिष बबनराव पेठे,संशोधक विद्यार्थी, कला व विज्ञान महाविद्यालय, कु-हा, विभाग प्रमुख*

DOI:10.5281/zenodo.16032318

**How to cite this article:**
*पेठे. आशिष. बबनराव., & देशपांडे, . विभा. प्र. (2025). चीनचा भारत शेजारी राज्यावर वाढता प्रभाव व भारत-चीन विवाद. Journal of Research & Development, 17(6), 70–72.*
*https://doi.org/10.5281/zenodo.16032318*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-6 | June - 2025

दिली, तेव्हापासून भारत-चीन संबंध बिघडत गेले.याची परिणीती 1962 च्या युध्दात झाली. तेव्हापासून भारत-चीन संबंध तणावपूर्ण दिसून येतात. भारत व चीन या दोन्ही देशात अनेक वेळा युध्दजन्य परिस्थिती निर्माण झली आहे. आज चीन भारताच्या शेजारील राष्ट्रांवर आपला प्रभाव पाडण्याचा मोठया प्रमाणात प्रयत्न करतो आहे, हे भारताच्या दृष्टीने फार घातक असून, चीन भारताला एक प्रकारे घेरण्याचा प्रयत्न करतांना दिसून येतो आहे. एकेकाळी भारतावर अवलंबून असलेली ही राज्य, आता चीनवरती निर्भर झालेली आहे. याकडे भारताने लक्ष देणे गरजेचे आहे. अटल बिहारी बाजपेयी म्हणायचे, "आपले शत्रू, मित्र बदलू शकतात, पण शेजारी नाही", म्हणून शेजारी राज्यांवर आपले लक्ष असले पाहीजे. आज चीन, भारत शेजारी असलेल्या, पाकिस्तान, नेपाळ, बांग्लादेश, अफगाणीस्तान, श्रीलंका या देशात आपला प्रभाव पाडत असून त्यांना अनेक कर्जे व व्यापारी दृष्टीकोनातून करार करीत आहे, त्यामुळे चीनचे हे कृत्य भारत-चीन विवाद वाढण्यास कारणीभूत ठरत आहे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोध निबंधाकरीता विश्लेषणात्मक, तुलनात्मक पध्दतीचा अभ्यास करुन प्रमाणीकृत पध्दतीचा अवलंब केलेला आहे. यात प्राचीन व दुय्यम साधनांचा तथ्य संकलनासाठी उपयोग केला आहे.

**चीनचा भारत शेजारील राष्ट्रांवर प्रभाव :-**

आज भारताच्या शेजारी असणा-या राज्यांवर चीनचा प्रभाव वाढलेला आहे. पाकिस्तान, नेपाळ, श्रीलंका, बांग्लादेश या ठिकाणी तर भारत विरोधी तेथील जनता व राजकीय नेत्यांद्वारे बयानबाजी होताना दिसून येत आहे. याचा आढावा आपण खालीलप्रमाणे घेऊ.

**1.पाकिस्तानमध्ये चीनचा प्रभाव :-**

भारत व पाकिस्तान हे दोन्ही देश 1947 मध्ये एकमेकांपासून वेगळे झाले. ब्रिटीशांनी भारताची फाळणी करुन भारतापासून पाकिस्तान हे नविन राज्य जगाच्या पाठीवर उदयास आले, आणि 1947 पासूनच भारत व पाकिस्तान यांच्यात विवाद आढळून येते. यात विशेष करुन काश्मीरचा प्रश्न, दहशतवाद पाकिस्तान कडून विविध लष्करी कारवाया आढळून येतात. भारत व पाकिस्तान यांच्यात आजपर्यंत 4 युध्दे लढली गेली. या चारही युध्दात भारताने पाकिस्तानला धूळ चारली. तरी सुध्दा पाकिस्तान हे सुधारण्यास तयार नाही. अलीकडेच पहलगाम दहशतवादी हल्ला व भारताचे ऑपरेशन सिंदूर यामुळे दोन्ही देशात तणाव निर्माण झाला. या तणावाला चीनने सतत खतपाणीच घातले आहे. चीन नेहमी पाकिस्तानला भारत विरोध मदत करतो ते पुढील प्रमाणे सांगता येईल.

**शक्सगाम घाटी :-** पाकिस्तानने 1963 मध्ये एका करारामध्ये शक्सगाम घाटी चीनला दिलेली आहे. ही POK मधील एक हिस्सा असून भारत POK ला आपण भूभाग मानतो. 1970 मध्ये या भागात चीन-पाकिस्तान या संयुक्तपणे कारकोरम राष्ट्र महामार्ग बनवण्यास सुरुवात केली. 1965 चे भारत व पाकिस्तान यांच्यात युध्द झाले, या युध्दात चीनने पाकिस्तानची बाजू घेतली.

**BRI व CPEC प्रोजेक्ट** :- बेल्ट अण्ड रोड इनिशिएटीव्ह व पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरीडोअर (CPEC) याला नेहमी भारत विरोध करतो कारण भारताला घेरण्यासाठी हे चीनचे पाकिस्तान मधले प्रोजेक्ट आहे म्हणून भारताने यावर आपत्ती घेतलेली आहे.

**शस्त्रास्त्र व लडावू विमानाचा पुरवठा** :- चीन पाकिस्तानला मोठया प्रमाणात शस्त्राचा पुरवठा करतो. पाकिस्तान त्याचा वापर भारत विरोधी कारवाई मध्ये करतो, तसेच अनेक दहशतवादी संघटनांना हे शस्त्रास्त्रे पुरवले जातात, तसेच लडाकू विमान ड्रोनचा पुरवठा चीन पाकिस्तानला करतो. आताच घडलेल्या ऑपरेशन सिंदूरला प्रतिउत्तर देतात. पाकिस्तानने चीनने दिलेल्या शस्त्र व ड्रोनचा वापर केला होता. चीन नेहमी भारत विरोधात संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये भूमिका घेऊन पाकिस्तानला साथ देतो, चीनच्या या भूमिकेमुळे भारत-चीन विवाद वाढत आहे.

**2.बांग्लादेशमध्ये चीनचा वाढता प्रभाव :-**

1971 मध्ये बांग्लादेशची निर्मिती झाली बांग्लादेशला पाकिस्तान पासून वेगळे करण्यास भारताची भूमिका फार महत्वाची ठरते. 1970 ला पाकिस्तान मध्ये निवडणूक झाल्या, यात पुर्वी पाकिस्तान म्हणजे आताच्या बांग्लादेश मधील आवामी लीग पक्षाला बहुमत प्राप्त झाले, पण पश्चिम पाकिस्तान या पक्षाला सत्ता स्थापन न करु देता पूर्वी पाकिस्तान मध्ये लष्करी कारवाही करायला सुरुवात केली, त्यामुळे लाखो बांग्लादेशी भारतात शरणार्थी आले. हा भार भारत पेलू शकत नव्हता, यामुळे भारताने पाकिस्तान सोबत युध्द पुकारले व यात भारताचा विजय झाला व बांग्लादेश हे नविन राज्य उदयास आले. भारत व बांग्लादेश यांचे संबंध तसे आधीपासून चांगलेच होते. भारताचे बांग्लादेश सोबत अर्थिक व राजकीय संबंध आहे, पण अलिकडच्या काळात चीनचा प्रभाव बांग्लादेश मध्ये वाढलेला दिसून येतो, आणि हे भारतासाठी धोकादायक आहे. बांग्लादेश दक्षिण पूर्व आशिया व सामरीक सुरक्षा, सिलीगुडी कॉरीडोअरच्या सुरक्षासाठी, भारताला महत्वाचा आहे. चीन, बांग्लादेशामध्ये मोठी गुंतवणूक करीत आहे. शेख हसिना यांचे सरकार तेथील गृहयुध्दाने हटवल्यानंतर भारताची चिंता वाढलेली आहे, अंतरीम सरकाराचे प्रमुख मोहम्मद युनस हे चीनच्या जवळच्या आहे असे दिसून येते. 2016 मध्ये चीनच्या महत्वाकांक्षी प्रोजेक्ट BRI मध्ये बांग्लादेश समाविष्ट झाला. त्यामुळे चीनच्या जवळ बांग्लादेश जात असून हे भारतासाठी संरक्षणाच्या दृष्टीने घातक आहे.

**३.नेपाळची चीनशी वाढती जवळीकता :-**

भारत व नेपाळी यांच्या संबंध महत्वाचे असेल, राजकीय, सांस्कृतीक, धार्मिक दृष्टया नेपाळ भारताच्या अगदी जवळचा आहे. भारत व नेपाळ यांचे अगदी रोटी-बेटी व्यवहार होतांना दिसते. नेपाळ मध्ये हिंदू व बौध्द धर्मीय मोठया संख्येने आहे. त्यामुळे नेपाळशी

भारताचे संबंध प्राचीन काळापासून सौहार्दपूर्ण आहे. दोन्ही देशामध्ये व्यापार विषय संबंध राहीले आहे. 2015 पर्यंत भारत नेपाळ मध्ये सर्वात जास्त गुंतवणूक करणारा देश होता. पण 2015 नंतर मात्र चीनचा प्रभाव नेपाळ मध्ये वाढतांना दिसून यतो. आज चीन मोठया प्रमाणामध्ये नेपाळ मध्ये गुंतवणूक करतांना दिसतो. नेपाळ युध्दात हळू हळू चीनशी जवळीक साधतांना दिसतो आहे. 2017 मध्ये नेपाळने चीन सोबत BRI करार केला. या कराराअंतर्गत चीनने 2.15 अब्ज डॉलर्स खर्चून ट्रान्स-हिमालय कनेक्टीव्हीटी नेटवर्क, कोसी इकॉनॉमीक कॉरीडोअर, गंडकी इकॉनॉमी कॉरीडोअर व मॅडम भंडारी युनिव्हर्सिटी फॉर सायन्स तयार करण्याचे मान्य केले. नेपाळ मधील सत्ताधारी साम्यवादी पक्षावर चीनचा प्रभाव असून, नेपाळ हा चीनच्या जवळ जातांना दिसतो आहे. भारत व नेपाळ यांच्यात संबध अव्वल असले तरी चीन सुध्दा नेपाळशी जवळीकता साधत आहे. 2015 पासून नेपाळ-भारत यांच्या संबंधात दुरावा आला असून, 2020 पासून नेपाळ मध्ये 90 टक्के FDI ही चीन कडून होत असून, हे भारताच्या दृष्टीने हानीकारक आहे. कारण जर नेपाळ चीनच्या जवळ गेला तर भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने हे घातक आहे.

**४.श्रीलंकेवर चीनचा प्रभाव व भारताची भूमिका :-**

श्रीलंका व भारत हे शेजारी देश असून दोन्ही देश एकमेकास परस्पर पुरक आहे. ऐतिहासिक, सांस्कृतीक दृष्टीकोनातून भारत-श्रीलंका यांचे प्राचीन काळापासून संबंध आहे. भारताच्या पौराणिक ग्रंथामध्ये लंकेचा (आताची श्रीलंका) यांचा उल्लेख पण आढळतो. भारतातील बौध्द धर्माचे श्रीलंकेमध्ये अनेक अनूयायी आहे. या दृष्टीने भारत व श्रीलंका यांचे धार्मिक, सांस्कृतीक संबंध दिसून येतात. भारत व श्रीलंका यांचे संबंध 1980 च्या दशकापासून बिघडत गेले, यांचे प्रमुख कारण श्रीलंकेच्या गृहयुध्दात भारताचा असलेला सहभाग होय. गृहयुध्दात LTTE या संघटनेने श्रीलंका सरकार विरुध्दात सशस्त्र लढा पुकारला होता. यानंतर भारतीय सेना श्रीलंकेत गेली, कारण 1987 मध्ये भारत व श्रीलंका यांच्यात शांतता करार झाला होता. या घटनेचा परिणाम भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधीची हत्या 1991 मध्ये झाली. या सर्व घटनांचा परिणाम भारत व श्रीलंका यांच्या संबंधामध्ये झाला. भारत हा नेहमीच श्रीलंकेचा विश्वासाहर्त मित्र राहलेला आहे. भारत व श्रीलंका यांच्यात संबंध जरी कधी कटू असले तरी मोदीच्या काळात जेव्हा श्रीलंकेची अर्थव्यवस्था डगमगली होती तेव्हा भारताने श्रीलंकेला मदत केली व कोवीड काळामध्ये ही भारताने श्रीलंकेला मोफत व्हॅक्सीन पुरवली. तरी पण आज चीन श्रीलंकेवर आपला प्रभाव वाढवण्यासाठी विविध कर्जे श्रीलंकेला देत असून भारताने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष :-**

1. भारत व चीन हे दोन्ही देश आप-आपला प्रभाव दक्षिण आशियायी पाडण्याचा प्रयत्न करीत आहे.
2. चीन भारताला घेरण्यासाठी भारत शेजारी राष्ट्राला मदत करुन, भारत विरोधी भडकवतो आहे.
3. चीन-भारत शेजारी देशात मोठया प्रमाणात आर्थिक गुंतवणूक करीत आहे.
4. भारत शेजारी राष्ट्र भारत व चीन या दोन्ही देशांना समान भागीदारीने संबंध प्रस्थापित करीत आहे.
5. भारताने सुध्दा चीनला घेरण्यासाठी क्वाड संघटनेमध्ये सामील झालेला आहे.
6. भारताने शेजारी राष्ट्रावर आपले संबंध अधिकाअधिक मजबूत करणे आवश्यक आहे.
7. भारत व चीन यांनी विविध विवाद शांततेत सोडवून आपले आर्थिक विकासावर लक्ष
8. केन्द्रीत करणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

1. अरुण शारी - भारत-चीन संबंध, प्रभात प्रकाशन दिल्ली
2. डॉ. शैलेन्द्र देवळणकर, समकालीन जागतिक राजकारण भारताच्या परराष्ट्र आणि संरक्षण धोरणापुढील आव्हाने, विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.
3. डॉ. शैलेन्द्र कुमार सिंह, भारत-चीन संबंध, दो कदम आगे चार कदम पीछे, आर.के. पब्लिशर्स, दिल्ली-110053
4. विजय नाईक - जिनपिंग यांचा विस्तारवादी चीन आणि भारत चढती कमान वाढते तणाव, रोहण प्रकाशन, गिरगांव, मुंबई
5. https://youtu.be/zOx6PQ-cxBB?si=grFSNoZyOErwiFBI